# इ) संगणक विभाग

## १. मार्कनेट प्रकल्प :

मार्कनेट म्हणजे मार्केट नेटवर्क. याअंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भव मिळवून देणे, तसेच बाजार समितीच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आणणे हा आहे.

सद्यस्थितीत मार्कनेट प्रकल्पांतर्गत २९४ बाजार समित्या व ६६ उपबाजारांचे संगणकीकरण पूर्ण करण्यात आले आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिति वेबसाईटद्वारे सर्वांना उपलब्ध करण्यात येते.

राज्यातील सर्व बाजार समित्यांना कृषि पणन मंडळाची ई-मेल सुविधा मंडळामार्फत विनामुल्य पुरविण्यात आली आहे. कृषि पणन मंडळ व बाजार समित्या यामधील पत्र व्यवहार व माहीती देवाण घेवाण या ई-मेल सुविधेद्वारे सुरू आहे. यामुळे माहीती देवाण घेवाणसाठी लागणा-या वेळेत व खर्चात बचत झाली आहे.

मार्कनेट प्रकल्पामुळे शेतमालाची दैनिक आवक व बाजारभाव याबाबत माहिती वेबसाईटद्वारे शेतकरी व इतर संबंधितांना उपलब्ध होत आहे. तसेच बाजार समित्यांमध्ये इंटरनेट व इमेल या अद्यावत सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

## २. कृषि पणन मंडळाची वेबसाईट :

कृषि पणन मंडळाची मंडळाची www.msamb.com ही वेबसाईट कार्यरत आहे. संगणकीकृत बाजार समित्या शेतमालाची आवक व बाजारभाव वेबसाईटवर अपलोड करतात.याप्रमाणे सदर वेबसाईटवर एकत्र झालेले बाजारभाव व आवक याबाबत माहिति सर्व बाजार समित्या व इतर संबंधितांना उपलब्ध असतात. पणन मंडळ राबवित असलेल्या विविध योजना, उपक्रम, प्रकल्प, कृषि पणनाबाबत कामकाजाची अद्यावत माहिती या वेबसाईटमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. कृषि पणनाबाबत सर्वांगीण माहिती असलेली राज्यातील किंबहूना देशातील ही पहिलीच वेबसाईट आहे. या वेबसाईटवर राज्यातील प्रमुख बाजार समित्यांची संक्षिप्त माहिती, कृषि मालाची निर्यात, कृषि निर्यात क्षेत्र, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, आंतरराष्ट्रीय स्तराचे फलोद्यान प्रशिक्षण केंद्र, पणन संचालनालय, इत्यादीबाबत माहिती मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दररोजचे व वायदे बाजारभाव ऑनलाईन उपलब्ध करुन देणारी ही एकमेव वेबसाईट.

## ३. शेतीविषयक माहितीसाठी एस.एम.एस.सेवा :

शेतमालाची आवक, बाजारभाव, हवामानाचा अंदाज, पीक सल्ला, पर्जन्यमान, किटकनाशके व खते यांच्या वापराबाबत मार्गदर्शन इत्यादी माहिती शेतकऱ्यांना मोबाईल फोनच्या एस.एम.एस.द्वारे उपलब्ध करुन देण्यासाठी कृषि पणन मंडळाने रॉयटर व नोकिया यांचेबरोबर सामंजस्य करार केला आहे. या उपक्रमामुळे

शेतमालाची आवक, बाजारभाव, हवामानाचा अंदाज. पर्जन्यमान, किटकनाशके व खते यांच्या वापराबाबत मार्गदर्शन इत्यादी माहिती मोबाईलमार्फत एस.एम.एस. द्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली जात आहे. यामुळे शेतकऱ्यांपर्यंत थेट बाजारभावाची माहिती पोहचून शेतमालाची विक्री करणे अथवा चांगले दर मिळेपर्यंत शेतमालाची साठवण करणे याबाबत शेतकऱ्याला निर्णय घेणे सोयीचे होत आहे. सद्यस्थितीत साधारण २००००० पेक्षा जास्त शेतकरी या सेवेचा लाभ घेत आहेत. या सेवेअंतर्गत ८० शेतमाल व २१० बाजार समित्यांचा समावेश करण्यात आला आहे.

## ४. प्राईस डीसीमिनेशन प्रोजेक्ट (प्राइज टीकर बोर्ड) :

केंद्र शासनाने शेतकऱ्यांना / बाजार समित्यांना वायदेबाजारामध्ये सहभागी करुन घेण्याचे ठरविले आहे. या योजनेमध्ये चालू बाजारभावाबरोबरच वायदे बाजारभाव शेतकरी व संबंधितांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामुळे शेतमालाचे सुगी पुर्व व पश्चात व्यवस्थापन करणे सहज शक्य होणार आहे. वायदे बाजारभाव शेतकरी व संबंधितांना सहजरित्या पाहता येईल यासाठी बाजार समितीच्या आवारात प्राईज टीकर बोर्ड (इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड) उभारणीबाबतची योजना ११ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत वायदे बाजार आयोगामार्फत राबविण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्यासाठी एन.सी.डी.ई.एक्स. ला प्राइज टीकर बोर्ड उभारण्याची जबाबदारी वायदेबाजार आयोगाने दिली आहे. सद्यस्थितीत १६० बाजार समित्यांमध्ये टिकर बोर्डची उभारणी पूर्ण झाली आहे. पुढील टप्प्यात ८३ बाजार समित्यांचे टिकर बोर्डची उभारणी करण्यात येणार आहे. या टिकर बोर्डद्वारे मराठीमध्ये शेतमालीची चालू व वायदेबाजारभाव बाजार आवारामध्ये शेतकरी व बाजार घटकांच्या माहितीसाठी दर्शविले जातात. टिकर बोर्ड उभारणीबाबत बाजार समित्यांना माहिती व्हावी यासाठी बाजार समित्यांच्या सचिवांसाठी तीन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

## ५. कृषि पणन मंडळाला आय.एस.ओ. ९००१-२००८ चे मानांकन प्राप्त :

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने आय.एस.ओ. ९००१-२००८ चे मानांकन प्राप्त केले आहे. आय.एस.ओ. मानांकन मिळविणारे देशातील पहिलेच पणन मंडळ ठरले आहे. या मानांकनामुळे राज्य कृषि पणन मंडळ करीत असलेल्या कामकाजाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. आय.एस.ओ. ९००१-२००८ हो मानांकन गुणवत्ता व्यवस्थापन पद्धत यासाठी आहे. याअंतर्गत ज्या घटकासाठी (ग्राहक) कामकाज करण्यात येते त्याचे समाधान कामकाजात सातत्याने सुधारणा व जबाबदारी, कामाची गुणवत्ता, वक्तशीर सेवा, सुसूत्रता आणि पारदर्शकता या बाबी विचारात घेतल्या जातात.

राज्यातील शेतकरी, बाजार समित्या व सर्व बाजारघटकांच्या गरजा विचारात घेऊन, कृषि पणन मंडळामार्फत प्रामुख्याने बाजार समित्यांच्या पायाभूत सुविधांचा विकास, शेतमालाचा देशांतर्गत व्यापार व निर्यातवृद्धी, प्रकल्प सल्ला, शेतकरी प्रशिक्षण, बाजार समित्यांचे संगणकीकरण मार्केट इंटेलिजन्स याबाबत कामकाज करण्यात येते. या कामकाजाचा दर्जा वाढविणे, त्यात सातत्याने सुधारणा करणे, जबाबदारी निश्चित करणे, सुसूत्रता व पारदर्शकता आणणे यासाठी कृषि पणन मंडळ आय.एस.ओ. ९००१-२००८ चे मानांकन प्राप्त केले आहे.

यासाठी पणन मंडळामध्ये कार्यरत असलेल्या सर्व विभागांच्या दैनंदिन कामकाजामध्ये आय.एस.ओ. ९००१-२००८ कार्यपद्धत लागू करण्यात आली. आय.एस.ओ. मानांकन देणाऱ्या संस्थेने सर्व विभागांच्या दैनंदिन कामकाजामध्ये या कार्यपद्धतीसाठी वरीलप्रमाणे सर्व निकष तपासण्यासाठी ऑडीट घेतले. त्यामध्ये त्रुटी न आढळल्याने कृषि पणन मंडळास सदर मानांकन देण्यात आले आहे. कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील शेतकरी, बाजार समित्या व सर्व बाजार घटक यांना दर्जेदार, वक्तशीर सेवा देण्यासाठी आणि केलेल्या कामकाजाचे मुल्यमापन करण्यासाठी या मानांकनाचा उपयोग होणार आहे.

## ६. अँगमार्कनेट योजना :

डायरेक्टर ऑफ मार्केटींग अँण्ड इन्स्पेक्शन (डी.एम.आय.), कृषि मंत्रालय, भारत सरकार यांनी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, दिल्ली (एन.आय.सी.) यांचेमार्फत अग्रीकल्चरल मार्केटींग इन्फॉर्मेशन सिस्टीम ही योजना राबविली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश भारतातील प्रमुख बाजारपेठेतील शेतमालाचे बाजारभाव व आवक या माहितीची देवाण-घेवाण करुन ती वेबसाईट मार्फत बाजार समित्या व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे हा आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत राजयातील २९४ मुख्य बाजार व ६६ उपबाजार यांना ७ टप्प्यांमध्ये संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. ६४ बाजार समित्यांना जुने संगणक बदलून नविन अद्यावत संगणकांचा पुरवठा करण्यात आला आहे. बाजार समित्यांच्या संगणक चालकांस प्रोत्साहन भत्ता बाबत रु.११.५५/- लाख चे वाटप.

## ७. मंडळाच्या कामकाजाचे संगणकीकरण :

कृषि पणन मंडळाचे मुख्यालय व पणन संचालनालय येथे अद्यावत लोकल एरिया नेटवर्क (लॅन) ची उभारणी करण्यात आली आहे. मुख्यालयामध्ये सहा सर्व्हर्स व ९० संगणक यांचे लोकल एरिया नेटवर्क (लॅन) कार्यरत आहे. मुख्यालयातील सर्व विभागप्रमुखांना ब्रॉड बँड इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. कृषि पणन मंडळाचा स्वतंत्र वेबसर्व्हर व मेल सर्व्हर कार्यरत असून वेबसाईटसाठी स्वतंत्र लीज्ड लाईनची उभारणी करण्यात आलेली आहे.

संगणक विभागामार्फत मुख्यालयामध्ये टॅली, कर्ज, ग्रामिण गोदाम, पगार पत्रक, अटेंडन्स, ए.एन.आर., कांदा ना हरकत प्रमाणपत्र,इनवर्ड, इन्कम टॅक्स, व्ही.एच.टी.,अंशदान, बाजारभाव भरणेइ.संगणक प्रणाली कार्यरत करण्यात आले असून त्यांची वेळोवेळी दुरुस्ती व देखभाल करण्यात येते. या व्यतिरिक्त बाजार समित्यांचे अर्थ संकल्प (मुळ, पुरवणी व पुर्नविनियोजन), अंशदान, आकारणी तसेच कांदाचाळ अनुदान योजना, प्लॅस्टिक क्रेट्स अनुदान योजना, टपालाची आवक, व्ही.एच.टी. येथील प्रशितगृह व शीतगृह, कृषि निर्देशिका अंतर्गत कांदा व शेतमाल साठवणूक, बाजार समितीचा व्यवसाय विकास आराखडा, बाजार समित्यांचे कलम १२(१) प्रस्ताव, पणन संचालनालयासाठी थेट खरेदी परवाना प्राप्त करण्यासाठी प्रणाली, साखर आयुक्त कार्यालयासाठी दैनंदिन टपाल प्रणाली, कृषि पणन मंडळाचे एम.आय.एस., शेतकरी निहाय

कांद्याची लागवड, उत्पादन व साठवणूक तसेच व्यापारीनिहाय खरेदी व साठवणूक माहितीचे ऑनलाईन संकलन, मंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांचे दैनिक कामकाजाचे ऑनलाईन संकलन (ऑनलाईन डायरी), कृषि पणन मित्र मासिकासाठी ऑनलाईन सभासद नोंदणी व मासिक वितरणासाठी लेबल छपाई, एस.एम.एस.अलर्ट यांचे कामकाजासाठी ऑनलाईन वेबबेस संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आल्या. तसेच कृषि पणन मंडळाच्या वेबसाईटचे नूतनीकरण करण्यात आले.

## ८. सांख्यिकीय माहिती :

बाजार समित्यांकडून प्राप्त होत असलेले मासिक, वार्षिक बाजारभाव  आवक, तसेच बाजार समित्यांची इतर सर्वसाधारण माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेसचा उपयोग करुन बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च, मार्केट फी तसेच वेब साईट डेटाबेसला उपलब्ध असलेली बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व किंमत याबाबत माहिती आवश्यकतेप्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येते.